महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५५ वा | दिनांक : १७/०३/२०२५ | वार : सोमवार

## नीतेश राणेंसारखा व्यक्ती मंत्री पदावर योग्य आहे का? ठाकरे गटाची टीका



**मुंबई :** भाजपचे आमदार आणि मंत्री नीतेश राणे यांच्याकडून वारंवार वादग्रस्त वक्तव्ये येत आहेत. त्याविरोधात ठाकरे गटाने नीतेश राणे यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. ठाकरे गटाचे नेते अखिल चित्रे यांनी याबाबत एक पत्र मुख्यमंत्री आणि राज्यपालांना लिहिले आहे. तसेच नीतेश राणे यांना मंत्रिपदावरून हटवण्याची मागणी त्या पत्रात केली आहे. तसेच मुख्यमंत्री समाजात फूट पाडणाऱ्या नीतेश राणेंच्या वक्तव्यांना पाठिंबा देता का? असा सवालही करण्यात आला आहे.

नीतेश राणे यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे आणि ती शपथ संविधानाची घेतलेली आहे आणि त्यात सगळ्या मंत्र्यांनी म्हटलेले आहे की कोणत्याही प्रकारचा आकस किंवा कोणाविरुद्ध बदल्याची भावना वगैरे ठेवणार नाही. सगळ्यांना समान वागणूक देणार वगैरे वगैरे आणि नीतेश राणे त्याचे वारंवार उल्लंघन करत असल्याचे मला वाटत आहे. राणे हे शपथविरोधी वागत आहेत तर गव्हर्नरने त्यांच्यावर कारवाई करावी" अशी मागणी अखिल चित्रे यांनी केली. याबाबत अखिल चित्रे यांनी ट्विट करत माहिती दिली आहे.

गव्हर्नरनी कारवाई करण्यासाठी जे या सरकारचे, राज्याचे प्रमुख आहेत देवेंद्र फडणवीस साहेब मुख्यमंत्री. त्यांनी मुख्यमंत्री म्हणून, हे शपथविरोधी वागत आहेत, असा प्रस्ताव गव्हर्नरकडे पाठवणे गरजेचे आहे. अकॉर्डिंग टू कॉन्स्टिट्यूशन आर्टिकल आणि हे जे काही वारंवार हे काय मंत्री महोदय आहेत ते कधी म्हणतात, की कोणत्या विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांना, सरपंचांना मी एक रुपयाही निधी देणार नाही. जो विकास निधी असतो, तो आमच्या टॅक्स पेअरचा असतो. तो काय तुमच्या घरातल्या तुमच्या वडिलांच्या प्रॉपर्टीतला पैसा नाही, असं अखिल चित्रे म्हणाले.

कोणी काय, कुठे खायचे यावर ते बोलतात. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मोडून तोडून सांगतात. हे सर्व असंवैधानिक वर्तन करताना ते अभिमानाने सांगतात की, माझा बॉस सागर बंगल्यावर आहे. संविधानाची शपथ घेऊन अशा पद्धतीने वागणारा व्यक्ती मंत्री पदावर योग्य आहे का? असा सवाल अखिल चित्रे यांनी केला आहे.

देवेंद्र फडणवीस हे राज्यातील सरकारचे प्रमुख आहेत. तुम्ही अशा वक्तव्यांना पाठिंबा देता का? जर नाही, तर तुम्ही अशा मंत्र्याविरोधात कायदेशीर कारवाई कधी करणार? असा सवाल अखिल चित्रे यांनी देवेंद्र फडणवीसांना केला आहे. राज्याचे नेते या नात्याने तुम्ही तुमचे मौन सोडणे आवश्यक आहे. या संबंधी तुम्ही तुमची भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असेही चित्रे म्हणाले.

## सुरेश धसांनी 'खोक्या'च्या वस्तीवर दिली भेट



**बीड :** भाजप आमदार सुरेश धस हे आज शिरूरच्या दौऱ्यावरती असून त्यांनी सतीश उर्फ खोक्या भोसलेच्या कुटुंबीयांची भेट घेतली. तीन दिवसांपूर्वी सतीश उर्फ खोक्या भोसले याचे घर आणि ऑफिस ग्लास हाऊस वन विभागाकडून पाडण्यात आले होते. सदरील घर आणि ऑफिस वन विभागाच्या जागेवर असल्याचे कारण सांगत वन खात्याने ही कारवाई केली होती. त्यानंतर आज भाजप आमदार सुरेश धस यांनी खोक्या उर्फ सतीश भोसलेच्या कुटुंबियांची भेट घेतली.

बीडच्या शिरूरमध्ये मारहाण प्रकरणी आणि प्राण्यांच्या शिकार केल्याच्या आरोपाखाली खोक्या उर्फ सतीश भोसले याच्यावर गुन्हा दाखल आहे. बीड पोलिसांनी त्याला अटक केलेली आहे. या कारवाईनंतर १३ मार्च रोजी वन विभागाने सतीश भोसलेच्या घरावर बुलडोझर चालवत त्याचे घर पाडले.. सतीश भोसलेचे घर वन खात्याच्या जमिनीवर अवैधरित्या बांधल्याचे कारण देत वन विभागाने ही कारवाई केली. त्यानंतर रात्रीच्या वेळी हे पाडलेले घर अज्ञातांनी पेटवून दिले. यामध्ये काही जीवनावश्यक वस्तू जळून खाक झाल्या. पोलिसांनी सतर्कता दाखवत ही आग विझवली. तर या ठिकाणी असलेल्या काही महिलांना मारहाण झाल्याचा आरोप करण्यात आला होता.

खोक्या उर्फ सतीश भोसले हा भाजप आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार सुरेश धस यांनी आज सतीश भोसलेच्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले. सुरेश धस यांना पाहताच सतीश भोसलेच्या कुटुंबीयांना अश्रू अनावर झाले होते.

खोक्या कुटुंबीयांचे सांत्वन केल्यानंतर सुरेश धस यांनी माध्यमांशी संवाद साधला. खोक्या भोसल हा लहान होता, पण त्याला किती मोठा गुंड केला, किती मोठा पैसेवाला केला. आता त्याचे काय झाले ते बघा, असे धस म्हणाले. तसेच त्याचे कुटुंबीय ६० वर्षांपासून त्या ठिकाणी राहत होते, असा दावाही सुरेश धस यांनी केला.

सतीश भोसले काही सापडलेले नसता नोटीस देऊन ते घर बंद करायला पाहिजे होते. कुटुंबीयांना घरातून हाकलून लावायचे असते. मागील ६० वर्षांपासून वन हक्क पट्टा कायदा लागू होत असताना फक्त तो अडाणी आहे, त्याने तुमच्याकडे अर्ज केला नाही, म्हणून घर पाडून टाकता. हे कोणत्या नियमांत बसते? असा सवाल सुरेश धस यांनी केला. आता त्याचे घर पाडलंय. वन विभागाने नोटीस न देता हे घर पाडलेले आहे. वन विभागाने कोणत्या नियमानुसार कारवाई केली, याची उत्तरे आम्हाला मिळाली तर बरे होईल, असे भाजप आमदार सुरेश धस म्हणाले.

खोक्या भोसले जेवढा मोठा करून दाखवला, तो तेवढा मोठा नाही. त्याची परिस्थिती काय झाली ते बघा. त्याला आता राहायला घरही नाही. जो चुकला त्याला तशा पद्धतीची शिक्षा मिळाली पाहिजे. त्याच्यावर ३०७ दाखल आहे, त्याला अटक झालेली आहे, असे सुरेश धस म्हणाले.

या कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी आम्ही विचार करू. त्यांना तात्पुरत्या स्वरूपात मदत करण्याचा प्रयत्न आहे. शिरूर तालुक्यात वृक्ष लागवड शून्य टक्क्यावर आले. हे लपवण्यासाठी असे कृत्य वन विभागाने केले. मी वन विभाग कायद्यानुसार हे कोणत्या कायद्यानुसार केले याची माहिती घेणार. हे घर साठ वर्षांपूर्वीच आहे. हे कोणत्या नियमात बसते, असे सुरेश धस म्हणाले. सतीश भोसले याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. बुलढाणा जिल्ह्यातील व्यक्ती वरून तक्रार दाखल केली होती. याचे घर पाडण्याचे कारण काय? कुणाच्या दबावाखाली केले हेच आम्ही बघत आहोत.

## देशाला कृषिप्रधान म्हणता? लाज वाटली पाहिजे - कैलास नागरेंच्या बहिणीने मंत्र्यांना सुनावले

**बुलढाणा :** येथील राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांनी तीन दिवसांपूर्वी शासनाच्या निषेधार्थ आत्महत्या केली होती. शेतकऱ्यांना खडकपूर्णा जलाशयातून पाणी मिळत नसल्यामुळे कैलास नागरे यांनी टोकाचे पाऊल उचलले. त्यातच आज त्यांच्या रक्षा विसर्जनाच्या कार्यक्रमाला मंत्री महोदयांसह दिग्गजांनी हजेरी लावली होती. यावेळी कैलास नागरे यांच्या बहिणीने सांत्वनासाठी आलेल्या मंत्री महोदयांवर संताप व्यक्त केला.

पालकत्व येत नसेल तर पालकत्व का स्वीकारता? असा सवाल करत देशाला कृषिप्रधान म्हणता? लाज वाटली पाहिजे, अशा शब्दांत सत्यभामा नागरे यांनी मंत्री प्रतापराव जाधव आणि आमदार सुनील कायंदे यांच्यासमोर आपला रोष व्यक्त केला. माझ्या भावासमोर आत्महत्या हा शब्द वापरू नका, तर बलिदान हा शब्द वापरावा, असे भावनिक आवाहनही कैलास नागरेंच्या बहिणीने केले.

राज्य पुरस्कार प्राप्त शेतकरी कैलास नागरे यांच्या रक्षा विसर्जनाचा कार्यक्रम बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ या त्यांच्या मूळगावी पार पडला. या कार्यक्रमाला विविध जिल्ह्यातील शेतकरी यांसह केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव आणि स्थानिक आमदार सुनील कायंदे यांची उपस्थित होती. त्यावेळी, कैलास यांची बहीण सत्यभामा नागरे यांनी राजकारण्यांना खडेबोल सुनावत आपल्या मनातील संताप व्यक्त केला.

माझ्या भावाला हे माहित होते की, या देशात बलिदान दिल्याशिवाय काहीही होत नाही आणि म्हणून त्याने शेतकऱ्यांसाठी बलिदान दिलेले आहे, असे सत्यभामा नागरे म्हणाल्या. देशाला राजकारणी हे कृषी प्रधान म्हणतात, यांना लाजा वाटायला पाहिजे की, कृषिप्रधान देशात शेतकरी आत्महत्या करतो आणि तेही पाण्यासाठी, अशा शब्दांत सत्यभामा यांनी आपल्या भावाच्या मृत्यूनंतर तीव्र भावना व्यक्त केल्या. आपले पालकमंत्री यांना वारंवार माझ्या भावाने विनंती केली. मात्र, अशा पालकमंत्र्यांना पालकत्व स्वीकारता येत नसेल तर कशाला पालकत्व स्वीकारतात? लाजा वाटल्या पाहिजे, असे खडेबोलही सत्यभामा नागरे यांनी राजकारण्यांना सुनावले. माझ्या भावाच्या नावासमोर आत्महत्या नाही तर बलिदान हा शब्द लावण्यात यावा, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ मार्च २०२५


## दौलताबाद येथील हजरत चांद शाह बोधले यांचे उरुस संपन्न



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : ऐतिहासिक दौलताबाद गाव हे अनेक सूफी संतांची पावन भूमी असून यात संत एकनाथ महाराजांचे गुरु संत जनार्धन स्वामी महाराज,हजरत मोमिन आरिफ रहमतुल्लाह अलै,हजरत बाओदीन अंसारी रहमतुल्लाह औलिया,संत मानपुरी स्वामी महाराज,हजरत चाँदशाह बोदल रहमतूलाह आलय,मर्दानोंदीन औलिया,हाफिज सय्यद अलावदिन असे अनेक महान सूफीसंतांची भूमी असून दौलताबाद येथे उर्स असो की पुण्यतिथी सर्व धर्म लोक हे उत्साहात साजरा करतात तसाच असेच एक दरगाह ऐतिहासिक दौलताबाद किल्ल्याच्या समोर पूर्वेस हजरत चाँदशहा बोदले यांची दरगाह असून येथे रमज़ानच्या तेराव्या रोज्याला यांचा उर्स असतो येथे रात्र भर भजन व कव्वाल्या चालतात उशीयाशी मुस्लिम मिलाद पठण करतात तर पायथ्याशी हिंदू भजन होते यात सर्व धर्मीय नागरिक मोठ्याप्रमनात सहभागी होतात.

यात प्रामुख्याने शंकर जाधव यांनी गायलेले कव्वाली भुला है तु ऊसिको जिसने तुझे बनाया,उसने तुझे बनाया,बेमान बन गया हैं तु तसेच मन लागा यार मेरा यार फकीरीमे,जो कुछ पाया राम भजनमें वो सुख नाही यार अमिरि मे या भजन, किसी देवताने आज मेरा दिल चुरलिया व दसनाम भयो रे दसनाम भयोरे गोसाई मढ़ी बनवाई मढ़ी बनवाई, कबीर खड़े बजारमे सबसे मांगे खेर ना किसीसे ना किसीसे बैर या भजनवर ही तसेच यानी भरदो झोली मेरी या मोहम्मद लोटकर मैं ना जाऊनगा खाली या कव्वाली वर ही प्रेक्षकांनी दाद दिलीया वेळी भजन गोरोबाकाका भजनी मंडळी शंकर जाधव,रावसाहेब पंडित,नारायण मेनकर जाधव,कृष्णा गुरु,नामदेव पेरकर,विश्वंभर आणंदे,चन्द्रभान जाधव ,अझीझ पठाण हे होते#गेल्या कित्येक वर्षापासून आम्ही येथे ऊर्स साजरा करतो येथे भजन व कव्वाली बारा बारिने होते आमच्या पूर्वजपासुन ही परंपरा सुरु आहे अशी माहिती दरगाहचे मुतवली शेख जमीरोदिन यांनी दिली

## वृक्ष पूजन करून, दिव्यांग मुलांसोबत केली होळी साजरी



**यवतमाळ (महेश मुंढे)** : प्रतिभा फाउंडेशनच्या वतीने वनसंपदेचे जतन व्हावे ,वृक्ष संवर्धन संगोपणाला महत्त्व देण्यात यावे त्या अनुषंगाने व ज्या बालकांना घडविणे, त्यांची संगोपन करणे त्यांना समाजाच्या प्रवाहात आणणे ही काळाची गरज समजून प्रतिभा फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी इंजि.प्रतिभा पवार, प्रो. डॉ सुधा खडके, सचिन शेळके,उषाताई दिवटे, उज्वालाताई देमगुंडे व सर्व प्रतिभा फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी वृक्षपूजनाने होळी साजरी करण्याचा संकल्प करून . वृक्ष पूजनकरून होळी साजरी केली. तसेच संजीवनी मतिमंद निवासी मुलांची शाळा पांढरकवडा रोड येथे जाऊन धुलीवंदनाचा दिव्यांग मुलांसोबत त्यांना गाठी देऊन,खाऊ देऊन, गुलाल उधळून त्या बालकांसोबत रंगोत्सव साजरा केला. या उपक्रमामध्ये संजीवनी मतिमंद मुलांची शाळा यांच्या संचालिका डॉ अस्मा काझी मुख्याध्यापक फरिदा पठाण तसेच सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सहयोगी बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत मुलांना रंग लावून, त्यांना खाऊ देऊन त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद बघण्यासारखा होता. अशाच प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम नेहमीच प्रतिभा फाउंडेशन च्या वतीने घेण्यात येतात. अशा सामाजिक उपक्रमामुळे समाज जाणीव जागृती निर्माण होते व एक सामाजिक संदेश देण्याचा प्रतिभा फाउंडेशन नेहमीच प्रयत्न करीत असते तसेच या नंतरही प्रतिभा फाउंडेशन तळा गाळत जाऊन आगळे वेगळे सामाजिक उपक्रम राबवीत राहू असे संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आव्हाहन केले.

## जॉन अब्राहमने देशात अल्पसंख्याक सुरक्षित नसल्याबद्दल केले भाष्य



अभिनेता जॉन अब्राहम त्याच्या 'द डिप्लोमॅट' या नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे. एका नवीन मुलाखतीत, अभिनेत्याने देशात अल्पसंख्याक सुरक्षित नाहीत या मुद्द्यावर आपले मत व्यक्त केले आहे. टाईम्स नाऊच्या नाविका कुमारला दिलेल्या मुलाखतीदरम्यान, जॉनला विचारण्यात आले की, भारतात अल्पसंख्याक असल्याने त्याला असुरक्षित वाटते का? या संपूर्ण चर्चेवर त्याचे काय म्हणणे आहे?

अभिनेत्याने हे पूर्णपणे नाकारले आणि म्हटले की त्याला देशात कधीही असुरक्षित वाटले नाही.

यावर प्रतिक्रिया देताना जॉन म्हणाला, 'कदाचित मी अभिनेता असेन, लोक वाद घालतात आणि म्हणतात, अरे, ऐका, तुम्ही एक अभिनेता आहात.' तुम्हाला माहिती आहे, लोक तुम्हाला आवडू शकतात किंवा इतर कारणांमुळे नापसंत करू शकतात. पण मी अल्पसंख्याक आहे. माझी आई पारशी आहे. माझे वडील सीरियन ख्रिश्चन आहेत. आणि मला माझ्या देशात जितके सुरक्षित वाटते तितके मला कधीच वाटले नाही.'

तो पुढे म्हणाला, 'मला माझा देश आवडतो आणि मला त्यात खूप सुरक्षित वाटते.' म्हणून, जे त्याला वधस्तंभावर खिळण्यासाठी निमित्त म्हणून वापरतात. त्यांच्यासाठी, मी याचे जिवंत उदाहरण आहे. कदाचित मी अशा अल्पसंख्याक समुदायातून आलो आहे ज्याच्याशी कोणालाही काही अडचण नाही.

मला माहित नाही... पारशी लोकांशी कोणाला अडचण असेल? स्वतःबद्दल बोलायचे झाले तर, मला या देशात खूप सुरक्षित वाटते आणि भारतीय असण्याबद्दल मला खूप चांगले वाटते. मला असेही वाटते की कदाचित माझ्यापेक्षा जास्त भारतीय कोणी नसेल. माझ्या खांद्यावर ही चिप आहे की मला वाटतं मी जिथे जातो तिथे भारतीय ध्वज घेऊन जातो.

अभिनेत्याचा 'द डिप्लोमॅट' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात तो राजनयिक जितेंद्र पाल सिंगच्या भूमिकेत दिसत आहे. या चित्रपटात पाकिस्तानात राहणाऱ्या उज्मा अहमद या भारतीय मुलीच्या सुटकेची खरी कहाणी दाखवण्यात आली आहे. उज्माच्या सुटकेत जेपी सिंग यांनी खूप महत्त्वाची भूमिका बजावली. त्यावेळी जेपी सिंग पाकिस्तानमधील भारतीय दूतावासात संयुक्त उच्चायुक्त म्हणून काम करत होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनसचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ मार्च २०२५

## बंजारा समाजाची पारंपारीक होळी साजरी



**दौलताबाद (शिवाजी गायकवाड) :** दौलताबाद किल्ल्याच्या पाठीमागे असलेल्या केसापुरी तांडा येथे बंजारा समाजाच्या वतीने मोठ्या उत्साहात होळी सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आलातसेच धुलीवंदनाच्या संध्याकाळी पारंपरिक गीते गाऊन साजरे करण्यात आलेनोकरी निमित्ताने गाव तांडे सोडून शहरात विविध ठिकाणी स्थायिक झालेले व्यापारी, चाकरवर्ग आवर्जून यासणासाठी उपस्थित होऊन सहभागी झाले होतेयात धुलीवंदनाच्या दिवशी प्रत्येक महिला एका हातात दोरी धरतात तर एका हातात काठी धरतात व पारंपरिक पद्धतीने गाणे म्हणत लोकनृत्य करतात यात सर्व विवाहित व अविवाहित तरुण सहभागी होतात व महिलांच्या मध्ये दोरीने बांधलेला हंडा पुरुष मंडळी हंडा सोडविण्यासाठी प्रयत्न करतात त्यावेळी सर्व महिला त्यांना काठीने मारतात ज्या युवकाने हा हंडा सोडला त्याला( पोस) मान म्हणून बक्षीस दिले जातेतर बाजूला पुरुष मंडळी एक मोठी आडवी काठी बांधतात व दोन्ही बाजूंनी लोकनृत्य करत गाणे म्हणतात व त्याला लाकडी काठीने मारतात व संध्याकाळी हा उत्सव समाप्त होतोमाजी सरपंच ज्ञानेश्वर पवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. केसापुरी तांडा होळी सण साजरा करण्यासाठी अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण व उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड व नायब तहसीलदार परेश चौधरी यांनी या होळीच्या सण मध्ये सहभागी होऊन आनंद घेत सण साजरे केले महिलांना पोस (बक्षीस) देण्यात आली

## ए.आर. रहमान यांना रुग्णालयातून डिस्चार्ज



ए.आर. रहमानच्या टीमने असेही सांगितले होते की ते रमजानमध्ये उपवास करत आहे, त्यामुळे त्यांना डिहायड्रेशनची समस्या येऊ शकते.

अलिकडेच, ए.आर.रहमान यांच्या माजी पत्नी सायरा बानू यांना वैद्यकीय आणीबाणीमुळे चेन्नईतील अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे त्यांच्यावर आपत्कालीन शस्त्रक्रिया करण्यात आली.

ए.आर.रहमान यांनी २० नोव्हेंबर २०२४ रोजी पत्नी सायरापासून घटस्फोटाची घोषणा केली होती. या जोडप्याचे १९९५ मध्ये अरेंज मॅरेज झाले होते, जे २९ वर्षांनी तुटले. या लग्नापासून या जोडप्याला तीन मुले आहेत. घटस्फोटाच्या घोषणेनंतर लगेचच, सायरा बानू यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## कळंकी येथे बिबट्या कडून आणखी एका कारवडीची शिकार



**कन्नड (अरुण थोरात) :** कळंकी शिवारात बिबट्यांचा उपद्रव वाढला असून आता पर्यंत दहा ते बारा पाळीव जनावरांच्या शिकारी बिबट्याने केल्या आहेत. दि. १६ मार्च रोजी पहाटेस आणखी एका कारवडी ची शिकार बिबट्याने केली आहे.कळंकी शिवारातील गट क्र. ११५ मधील शेतकरी किसन संपत थोरात यांच्या शेतात गोठ्यात बांधलेल्या तीन वर्षे वयाच्या कारवडी ची शिकार बिबट्याने करून कारवडीस जवळील शिवनानदी पात्रात फरफटत नेऊन ताव मारला. ही घटना पशुपालक शेतकरी किसन थोरात हे सकाळी गाई चे दुध काढण्यासाठी गेले असता लक्षात आली. याबाबत प्रादेशिक वनविभागाला माहिती देण्यात आली. त्यावरुन वनरक्षक पी.जी. लकडे यांनी घटनास्थळी भेट देऊण, पंचनामा केला. आता पर्यंत कळंकी शिवारात बारा पाळीव जनावरांच्या शिकारी बिबट्याने केल्या आहेत. गेल्या कित्येक वर्षातील, यावर्षातील हा उच्चांक आहे.गौताळा अभयारण्या सह प्रादेशिक वनविभाचा मोठा जंगल भाग गाव शिवारात आहे. त्यामुळे तृणभक्षी वन्यजीवांच्या उपद्रवाने शेतकरी त्रस्त आहेत. तर बिबट्या कडून पाळीव जनावरांच्या शिकारी नित्याने होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. याकडे शासनाने लक्ष देऊन संपुर्ण शेती क्षेत्रास तारकुंपण करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## मराठवाडा शिक्षक संघातर्फे स्व. धनंजय नागरगोजे यांना श्रद्धांजली !



**छत्रपती संभाजीनगर :** अठरा - वीस वर्षे विनावेतन काम करणाऱ्या धनंजय नागरगोजे सरांना इतक्या दीर्घ काळापासून वेतन नसल्याने ते हतबल झाले होते, म्हणूनच धनंजय नागरगोजे यांनी स्वतः च्या आर्थिक परिस्थिती साठी मी काय करू असे मुजोर राक्षसी संस्थाचालकास विचारले असता, त्याने फाशी घेण्याचा सल्ला दिला. आणि त्यातच निराशेच्या प्रचंड गर्तेत सापडलेल्या धनंजय नागरगोजे नावाच्या शिक्षकाने फेसबुक पोस्ट आपल्या तीन वर्षे चिमुकल्या मुलीला करून माफी मागून गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपविली. मृत्यूस जबाबदार असलेल्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास देणाऱ्या संस्थाचालक व कार्यकर्ते यांची यादी त्यांनी फेसबुक पोस्ट करून दिली आहे. ही संस्थात्मक हत्या आहे हे स्पष्ट आहे संस्थाचालकांनी विना वेतन काम करणाऱ्या धनंजय नागरगोजे यांचा घेतलेला हा बळी असून संस्थाचालकावर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा जेणेकरून त्या सर्व गुन्हेगारांवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे छत्रपती संभाजीनगर चे जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांनी केली आहे.

यावेळी डॉ उमाकांत राठोड, योगेश खोसरे, नवनाथ मंत्री , अशोक ढमढेरे, विनोद केनेकर, विलास चव्हाण, विलास चांदणे, विलास भुतेकर, अजय कदम, बालू पवार, दिपक वाघ, गणेश राठोड, पद्माकर पगार, संतोष सुरडकर, पोपट आगवण, अरूणा चौधरी, शितल कवडे, सविता हिंगे यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १७ मार्च २०२५


## गौतम अदानी यांनी घेतली मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट



उद्योगपती गौतम अदानी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. शनिवारी, रात्री उशिरा सागर बंगल्यावर या दोघांमध्ये चर्चा झाली. या भेटीमुळे चर्चांना उणाण आले आहे. यावेळी दोघांमध्ये चर्चा झाल्याची ही माहिती पुढे आली आहे. मात्र दोघांच्या भेटीमागचे कारण काय? हे अद्याप गुलदस्त्यात आहे. मात्र या मध्यरात्रीच्या भेटी मुळे अनेक तर्क-वितर्क लावले जात आहे.

दरम्यान काही दिवसांपूर्वीच अदानी समूहाने मुंबईतील गोरेगाव पश्चिम येथील १४२ एकरवरील मोतीलाल नगर पुनर्विकासाच्या निविदेत बाजी मारली. अदानी समूहाने ३६ हजार कोटींची बोली लावली. त्यानंतर गौतम अदानी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यातील ही पहिली भेट आहे.

उद्योजक गौतम अदानी हे रात्री अकरा वाजेच्या दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर दाखल झाले. मुंबईसह राज्यातील विकास प्रकल्पांबद्दल दोघांमध्ये चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. रात्री साडे बारा वाजेच्या सुमारास अदानी हे सागर बंगल्यातून बाहेर पडल्याचे दिसून आले. जवळपास दीड तास त्यांची आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चर्चा झाली आहे.

डिसेंबर महिन्यात मुख्यमंत्री फडणवीस आणि उद्योजक अदानी यांच्यात जवळपास दीड तास चर्चा झाली होती. राज्यात अदानी यांचे अनेक महत्त्वाचे प्रकल्प सुरू आहेत. यात आता नव्या एका प्रकल्पाची भर पडली आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्पानंतर अदानी समूहाल मुंबईतील आणखी एक महत्त्वाचा प्रोजेक्ट मिळाला आहे. हा प्रोजेक्ट ३६००० कोटी रुपयांचा आहे. मुंबईतील सर्वात मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांपैकी हा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. अदानी समूहाच्या अदानी प्रॉपर्टीज प्रा.लि. कंपनीला मुंबईतील मोतीलाल नगर I, II,III, गोरेगाव पश्चिम येथील १४३ एकरमधील गृहनिर्माण प्रकल्पाच्या पुनर्विकासाचे काम मिळाले आहे. अदानी समूहाने या प्रकल्पासाठी सर्वाधिक ३६००० कोटी रुपयांची बोली लावली होती. त्यामुळे या भेटीला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## मोदी-शहा जाताना देशाचे तुकडे करून जातील - संजय राऊत



**मुंबई** : शिवरायांचा इतिहास बदलणे, हिंदू-मुसलमानांसाठी स्वतंत्र दुकानांची मागणी हा ठरवून सुरू असलेला मूर्खपणा भारताला हिंदू पाकिस्तानच्या दिशेने ढकलत आहे, असे म्हणत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजप सरकारवर टीका केली आहे.

दरम्यान संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, मोदी-शहांचे राज्य एक दिवस जाणारच आहे, पण जाताना ते देशाचे तुकडे करून जातील. गेल्या दहा वर्षांत भारतात हिंदू आणि मुसलमान अशी दोन राष्ट्रे निर्माण झाली आहेत. हे वातावरण फाळणीसदृश आहे.

संजय राऊत यांनी म्हटलंय की, मोदी काळाचे आता अंतिम पर्व सुरू झाले आहे. मोदी व त्यांचे लोक केव्हा तरी जातील, पण जाताना या देशाचे तुकडे करून जातील हे स्पष्ट दिसते. देशात आज जो जातीय आणि धार्मिक विद्वेष वाढला आहे तो फाळणी आधी याच पद्धतीने दिसत होता. आज येथले काही हिंदू (अर्थात बाटलेले) पुढारी बा. जिनांच्या भूमिकेत शिरले आहेत. देशासाठी ते धोकादायक आहे. भारतात सावरकरांनी द्विराष्ट्र सिद्धांत मांडला होता. भारतीय मुसलमान आणि भारतीय हिंदू ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत. त्यांचे आपले स्वतंत्र धर्म, परंपरा, रीतिरिवाज आहेत. त्यामुळे सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून मुसलमानांना हिंदूबहुल भारताबाहेर आपली वेगळी मातृभूमी निर्माण करण्याचा अधिकार असायला हवा, असे त्यांचे म्हणणे होते.

डॉ. आंबेडकर यांनीही एकदा सांगितले होते की, येथे हिंदू आणि मुसलमान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे नांदताना दिसत आहेत. मात्र पंडित नेहरू या शहाण्या माणसाने ठोकून जाहीर केले, देशाची घटना धर्मनिरपेक्ष राहील. मी भारताचे हिंदू पाकिस्तान होऊ देणार नाही. धर्माच्या आधारावर निर्माण झालेली अनेक राष्ट्रे कोसळून पडली. त्यात पाकिस्तान आहेच. पंडित नेहरूंसारख्या लोकांनी या देशाचे हिंदू पाकिस्तान होऊ दिले नाही म्हणून हा देश टिकला, पण मोदी काळात देश पुन्हा नव्या फाळणीच्या दिशेने ढकलला जात आहे. हिंदू पाकिस्तानच्या दिशेने आपण निघालो आहोत काय?

मुसलमानांच्या कुरापती काढून त्यांना भडकविण्याचा राष्ट्रीय कार्यक्रम राबवला जात आहे, तो धक्कादायक आहे. दुबईत भारत विरुद्ध न्यूझीलंड चॅम्पियन्स ट्राफी अंतिम सामन्यात भारत विजयी झाला. त्यानंतर ठिकठिकाणी भाजपच्या समर्थकांनी विजयी मिरवणुका काढल्या. या मिरवणुका रात्रीच्या वेळी मुद्दाम मशिदीसमोर आणून तेथे गोंधळ घालणे, जोरजोरात वाद्ये वाजविणे, मुसलमानांच्या विरोधात घोषणा देणे असले प्रकार सुरू झाले. मध्य प्रदेशातील महू येथे यामुळे दोन गटांत दंगल उसळली. त्याचे पडसाद इतरत्र उमटले. विजय उत्सव साजरा करण्याची ही पद्धत नाही, पण हे प्रकार सातत्याने घडवून देशात दंगलीचा भडका उडविण्याचे कारस्थान रचले जात आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## विधान परिषदेसाठी भाजपचे उमेदवार जाहीर



**मुंबई** : विधान परिषदेसाठी भाजपचे उमेदवार जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगरच्या संजय केनेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर संदीप जोशी आणि दादाराव केचे यांनाही संधी देण्यात आली आहे.

दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. ५ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी भाजपने ३ जणांचे नाव जाहीर केले आहे. आता २ जागांसाठी कुणाला संधी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागले आहे. मागील ३३ वर्षांपासून निष्ठेने काम केल्याने पक्षाने मोठी संधी दिली, असे संजय केनेकर यांनी म्हटले आहे.

२० मार्च ही अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. त्यानंतर २७ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत निवडणूक होईल. त्यानंतर सायंकाळी ५ वा. लगेचच मतमोजणीला सुरुवात होऊन रात्री उशिरापर्यंत निकाल जाहीर होतील.

आर्वीचे माजी आमदार दादाराव केचे यांचे नाव भाजपकडून विधानपरिषद करिता आज जाहीर करण्यात आले. केचे यांची विधानसभेत उमेदवारी कापून सुमित वानखेडे यांना देण्यात आली होती. त्यामुळे केचे नाराज होते. उमेदवारी नाकारल्यामुळे केचे बंडाच्या तयारीत होते. आर्वी मतदारसंघातून तिकीट नाकारलेल्या दादाराव केचे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्यास नक्की संधी देणार असे सांगण्यात आले होते. आता त्यांना संधी देण्यात आली आहे.

संजय केनेकर हे छत्रपती संभाजीनगरमधून येतात. त्यांनी पक्षाचे महामंत्री म्हणून उत्तम काम केलेलं आहे. २०२१ मध्ये पोटनिवडणुकीत संजसय केनेकर यांना संधी देण्यात आली होती. मात्र, त्यावेळी त्यांना आमदार होता आले नाही. यानंतर आता ४ वर्षांने त्यांना संधी देण्यात आली आहे. तर संदीप जोशी हे नागपूरमधून येतात. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात.

•संदीप जोशी नागपूर महापालिकेतील भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक. चार वेळा नागपूर महापालिकेत नगरसेवकपदी. संदीप जोशी हे लघु उद्योग विकास महामंडळाचे अध्यक्ष. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय म्हणूनही ओळखले जातात. विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या मतदारसंघात प्रचाराची जबाबदारी. नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपकडून रिंगणात उतरले, मात्र काँग्रेस उमेदवार अभिजीत वंजारी यांच्याकडून पराभव १९८८ मध्ये संजय केनेकर हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये कार्यकर्ता म्हणून काम करू लागले. यानंतर युवामोर्चात वार्डअध्यक्ष ते प्रदेश उपाध्यक्ष म्हणून काम केले. यानंतर १५ वर्षे संभाजीनगर महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून त्यांनी काम केले आहे. यात वयाच्या २३ व्या वर्षी ते संभाजीनगर मनपाचे उपमहापौर म्हणून निवडून आले. तर कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी ६ वर्षे काम पाहिले.

राजेश विटेकर विधानसभेत गेल्याने राष्ट्रवादी काँग्रेसची एक जागा रिक्त आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही विधानपरिषदेवर जाण्यासाठी इच्छुकांची गर्दी दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीकडून झिशान सिद्दीकी, संजय दौंड आणि उमेश पाटील यांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी कागदपत्रे तयार ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे.त्यामुळे अजित पवार आता विधान परिषदेवर कोणत्या नेत्याला संधी देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.